

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय उदगीर येथे संशोधनांती म्हशींमध्ये स्फुरद कमतरतेमुळे होणाऱ्या लालमुत्र आजारात हिमोग्लोबिन <५ ग्राम प्रती १०० मिली किंवा पी.सी.व्ही. १५% पेक्षा कमी असणाऱ्या म्हशींमध्ये प्रस्थापित उपचार व प्रस्थापित उपचारपद्धतीबरोबर रक्त संक्रमण या अनुषंगिक उपचारपद्धतीचा वापर केल्यानंतर अनुक्रमे ८३% आणि १००% म्हशी आजारातून बऱ्या झाल्याचे आढळून आले. म्हणजेच अतिरिक्त रक्त संक्रमण केल्यास म्हशींमध्ये या आजारापासून होणारी मरतुक टाळता येते.



लाल मुत्र बाधित म्हैस रक्त संक्रमण व उपचारापूर्वी



रक्त संक्रमण केलेली उपचारानंतर बरी झालेली म्हैस



उपचारादरम्यान लघवीच्या रंगामध्ये होत जाणारा बदल

प्रतिबंध

- चांगली दुग्धउत्पादकता असलेल्या म्हशींच्या आहारातील स्फुरद खनिजाचे व्यवस्थित नियोजन केल्यास लालमुत्र या आजाराला आळा घालता येवू शकतो.
- आहारातील शुष्क पदार्थांच्या तुलनेत ०.३२ ते ०.३६% स्फुरद आहारात दिल्यास म्हशींमध्ये स्फुरद कमतरता टाळता येते.
- सर्वसाधारणपणे प्रौढ ४०० किलो वजनाच्या म्हशीच्या आहारामध्ये १२ ते १३ ग्राम स्फुरद देणे गरजेचे असते. एक किलो दुधासाठी २ ग्राम जादा स्फुरदची गरज असते.
- हिरव्या चाऱ्यामध्ये स्फुरदचे प्रमाण ०.२% तर खुराकमध्ये ०.४ ते ०.६% एवढे असते तर वाळलेल्या चाऱ्यामध्ये हे प्रमाण अगदी नगण्य (<०.१%) असते. म्हणून हा आजार टाळण्यासाठी म्हशींच्या आहारामध्ये पुरेसा हिरवा चारा आणि खुराक देण्यात यावा.
- दुधाळ म्हशींच्या आहारात संतुलित आहाराबरोबर नियमित ५० ग्राम खनिजक्षार मिश्रण पुरवठा केल्यास स्फुरदसह इतर खनिजांची गरजही पूर्ण होवून स्फुरद कमतरतेमुळे होणारा जीवघेणा लालमुत्र हा आजार पूर्णपणे टाळता येतो.

प्रा. डॉ. अनिल भिकाने
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

डॉ. रविंद्र जाधव
सहाय्यक प्राध्यापक
चिकित्सालयीन औषधशास्त्र विभाग,
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगी

मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/८/२०२५

म्हशीतील लालमुत्र आजार



प्रकाशक
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – ४४०००१
टोल फ्री क्रमांक – १८००-२३३-३२६८
संकेतस्थळ – www.mafsu.ac.in

प्रस्तावना

म्हशींमध्ये लालमुत्र किंवा प्रसूतीपश्चात हिमोग्लोबिनयुरिया हा उत्पादकतेशी निगडीत आर्थिकदृष्ट्या महत्वाचा आजार असुन तो महाराष्ट्रात सर्वदूर आढळतो. हा आजार क्वचित दुभत्या गाईतही आढळतो. साधारणपणे ५-१० वर्ष वयोगटातील ३-७ व्या वितातील म्हशी या आजारास जास्त बळी पडतात. गाभण काळातील शेवटचे ३ महिने किंवा व्याल्यानंतर पहिले १-२ महिने या कालावधीमध्ये प्रामुख्याने हिवाळा व उन्हाळ्यात या आजाराचे जास्त प्रमाण आढळून येते. एकदा हा आजार उद्‌भवल्यास बाधित म्हशींचे दुग्धउत्पादन घटते, उपचारावर मोठा खर्च करावा लागतो त्याचप्रमाणे वेळेवर उपचार न केल्यास पशुपालकांचे मौल्यवान पशुधन दगावू शकते आणि त्यातून पशुपालकाला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते.

कारणे

- महाराष्ट्रातील जमिनीमध्ये स्फुरदची कमतरता ही मोठ्या प्रमाणावर आढळून येते त्यामुळे चाऱ्यामध्ये स्फुरदचे प्रमाण कमी असते.
- बहुतांश भागात म्हशींचा उदरनिर्वाह वाळलेल्या चाऱ्यावर केला जातो आणि वाळलेल्या चाऱ्यामध्ये स्फुरदचे प्रमाण नगण्य असते.
- म्हशींच्या आहारात खुराकाचा अंतर्भाव नसणे किंवा अत्यंत कमी प्रमाणात खुराक देणे. खुराकात स्फुरदचे प्रमाण चांगले असते.
- म्हशींच्या आहारात खनिजक्षार मिश्रणाचा पुरवठा न करणे.
- गाभण काळाच्या शेवटच्या टप्प्यात गर्भातील वासराच्या वाढीसाठी तसेच व्यालेल्या म्हशींमध्ये दुधउत्पादनासाठी आहारात स्फुरदची गरज वाढते.

लक्षणे

- लाल, काळसर किंवा कॉफीच्या रंगाची लघवी होणे.
- शेण टाकताना कुंथून टाकणे.
- दुधउत्पादन घटणे.
- खाणेपिणे मंदावने, वजन घटणे, अशक्तपणा वाढून जनावर मलूल होणे.
- शरीराचे तापमान जरी सर्वसाधारण असले तरीही नाडीचा आणि श्वसनाचा वेग वाढणे.
- तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय होणे (डोळ्यातील श्लेष्मलपटल पांढरे किंवा कावीळ झाल्यास पिवळसर पांढरे पडणे)
- बाधित म्हशींचा उपचार केला नाही तर तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय होवून ४-५ दिवसात बाधित म्हशी दगावण्याची शक्यता असते.



बाधित म्हशीमध्ये लाल रंगाची लघवी



बाधित म्हशीमध्ये पिवळसर पांढरी पडलेली श्लेष्मल त्वचा

निदान

- हा आजार प्रामुख्याने नव्याने व्यालेल्या किंवा गाभणकाळाच्या शेवटच्या टप्प्यात (७ ते १० महिने) असणाऱ्या म्हशींमध्ये डिसेंबर ते जुलै दरम्यान आढळून येतो.
- लालसर किंवा कॉफी सारख्या रंगाची लघवी होणे, कुंथुन शेण टाकणे आणि अशक्तपणा येणे.
- स्फुरद खनिज इंजेक्शन ३-५ दिवस दिल्यास बाधित म्हशी उपचारास प्रतिसाद देतात.
- रक्तामधील स्फुरदचे प्रमाण कमी होते (४-६ ग्राम प्रति १०० मिली रक्त).

उपयायोजना

- या आजाराचे तात्काळ निदान करून पशुवैद्यकांकडून उपचार करून घेतल्यास बाधित म्हशींना वाचवता येते.
- यामध्ये प्रामुख्याने स्फुरद खनिजयुक्त इंजेक्शन, ग्लुकोज सलाईन, ब जीवनसत्व इंजेक्शन चार पाच दिवस द्यावेत. रक्तवर्धक टॉनिक २० ते ३० दिवस वापरल्यास म्हशी उपचारास प्रतिसाद देवून आजारातून बऱ्या होतात. परंतु उपचार सुरु करण्यास विलंब झाल्यास उपचारांती बाधित म्हशींमध्ये तीव्र स्वरूपाचा रक्तक्षय, मुत्रपिंड बाधा आणि कावीळ होवून मरतुक होऊ शकते.
- जर बाधित म्हशींमध्ये हिमोग्लोबिन ५ ग्राम प्रती १०० मिली पेक्षा कमी झाल्यास अशा म्हशींमध्ये निरोगी दाता म्हशीचे सुसंगत असे किमान १.५ ते २ लिटर रक्त चढविण्यात यावे.